# रोपवाटीका व्यवसाय

शेतीचा प्रवास पारंपारीकतेकडून व्यापारीकरणाकडे जसजसा होत गेला तस तसे शुध्द बिजांचे महत्व अधिकाअधिक दृढ होत गेले आणि म्हणूनच गेल्या दोन—तीन दक्षकांपासून विशेषत: उद्यानवर्गीय पिकांमध्ये रोपवाटीका व्यवसाय अत्यंत भरभराटीत आलेला कृषि पुरक व्यवसाय म्हणून मान्यता पावला आहे. महाराष्ट्रातील पारंपारीक फळपिकांची उदा. आंबा, काजू, नारळ, द्राक्ष, चिकू, पेरु, डाळींब, संत्री, मोसंबी इ. मोठयाप्रमाणावर व्यापारी लागवड झाली आहे. महाराष्ट्रातील कोकण विभागाचे रत्नागिरी आणि सिधुंदूर्ग जिल्हे विविध फळपिकांच्या दर्जेदार कलमांसाठी संपूर्ण देशामध्ये नावाजलेले आहेत. रोपावटीका व्यवासाय हा तरुण वर्गासाठी रोजगार निर्मितीचे उपयुक्त साधन बनले आहे. फुलपिके, भाजीपाला पिके, शोभिवंत झाडे, घनलागवडीस उपयुक्त झाडे, विशिष्ठ मुळकांडावर तयार केलली कलमे ऊती संर्वधनातून तयार केलेली रोपे यासारखे विविध प्रकार अलीकडच्या काळात विकसित झाले आहेत. रोपवाटीकेमध्ये मातृवृक्ष बागेचे महत्व अनन्यसाधारण आहे. या सर्व सुविधा उपलब्ध केल्यावर सरकारी यंत्रणेकडून परवाना प्राप्त करावा लागतो. रोपवाटीका उभारण्या अगोदर योग्य जागेची निवड करणे आवश्यक आहे. रस्ता, पाणी, वीज, मजुरांची उपलब्धता यासारखे मुददे विचारात घेणे गरजेचे आहे. त्यानंतर आवश्यक सोई सुविधा ज्यामध्ये हरितगृहे, पॉलीटनेल, शेडनेट गृहे, भांडार इ. बाबी आवश्यक आहेत.

कलमे तयार करण्यासाठी योग्य रोग व किड विरहित सुदृढ मुळकांड तयार करावे. मुळकंद तयार करताना निर्जंतुक केलेल्या मिश्रणाचा वापर करावा. मुळकांड तयार झाल्यावर योग्य पध्दतीचा वापर करुन कलमे तयार करावीत. कलम बांधण्याच्या पध्दतीनुसार मुळकांडाचे वय ठरविले जाते. त्यानुसार योग्य मुळकांड व काडीची निवड करुन शिफारस केलेल्या हंगामामध्ये प्रशिक्षित माळयाकडनू कलम बांधणीचे काम करुन घ्यावे.

विविध प्रकारच्या कलम पध्दती

| अ.क्र. | कलम पध्दत | पीक | मुळकांडाचे वय | योग्य हंगाम |
|---|---|---|---|---|
| १ | कोय कलम | आंबा, फणस, जायफळ | उगवणीपासून १० ते १५ दिवस | जुन—जुलै |
| २ | मृदकाष्ट कलम | काजू, आंबा, फणस, चिकू, आवळा, जांभूळ | दिड ते सहा महिने | ऑक्टोबर, फेब्रुवारी, मार्च |
| ३ | भेट कलम | आंबा, चिकू, पेरु, फणस | ६ महिने ते १ वर्ष | जुन—जुलै, ऑक्टोबर, फेब्रुवारी, |
| ४ | खोगीर कलम | पेरु, फणस | ६ महिने ते १ वर्ष | जुन—जुलै, ऑक्टोबर, फेब्रुवारी, |

अलिकडच्या काळामध्ये कलमे मोठया पिशवीमध्ये (१०''x १४'' १२'' x १४'' इ.) करण्याचे प्रमाण वाढले आहे अशा पिशवीमध्ये मुळे तसेच खोड यांची वाढ उत्तम होत असल्याने कलमे चांगली वाढतात अशी कलमे लागवडीनंतर चांगली स्थिरावतात. काही फळपिकांमध्ये प्लॅस्टीक पिशव्यांऐवजी रुट ट्रेनरचा वापर सुरु झाला आहे. (उदा. द्राक्ष, डाळींब इ.) भविष्यात बहुसंख्य पिकाची कलमे रोपे रुट ट्रेनर मध्ये तयार होतील. त्यामुळे मातीचा वापर कमी होईल. त्याचप्रमाणे घन लागवडीसाठी उपयुक्त अशी शाखीय व्यवस्थापन केलेली कलमे देखील उपलब्ध केल्यास बागायतदारांना फायदेशीर होऊ शकेल.




